# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/08/2023 (बुधवार) दुपार


---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. मौदा :– दिनांक ३१/०७/२०२३ चे १०.०० वा. ते १६.०० वा. सुमारास पो.स्टे. मौदा हद्दीत फिर्यादी हे दिनांक ३१/०७/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. दरम्यान रामटेकला काही कामानिमीत्त गेले होते व पत्नी ही सकाळीच कामाला गेली होती व मोठी मूलगी ही कॉलेजला गेली होती व लहान मुलीचे डोळे आल्याने ती घरीच होती. फिर्यादी यांचे काम आटोपल्यावर दुपारी अंदाजे ४.०० वा. घरी परत आले तेव्हा मोठी मूलगी वय १६ वर्ष ही घरी दिसली नाही म्हणून फिर्यादी यांनी कॉलेज मध्ये जावून पाहीले असता चपराशी नामे– रमेश वाढीवे याला विचारले असता कॉलेज सूटल्यावर सर्व मूल मूली घरी निघून गेले असे सांगितले फिर्यादीच्या मुलीच्या मैत्रीणीला विचारले असता तिने उडवा उडवीचे उत्तर दिले त्यानंतर तिला सक्तीने विचारले असता तिने **संशयित आरोपी नामे– प्रफूल हटवार, रा. तारसा** यांचे सोबत कॉलेज सूटल्यावर जातांना दिसली असे सांगितले गावात राहणारा प्रफूल याने फिर्यादीच्या मुलीला फूस लावून पळवून नेले असा फिर्यादीचा संशय आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार आंधळे ब. नं. ७२१ मो. क्र. ८२०८८७४६६५ हे करीत आहे.

### चोरी

१) पो.स्टे. खापा :– अंतर्गत ०३ किमी अंतरावरील मौजा खापा (हळद) शिवारातील दिनांक ३०/०७/२०२३ चे ०२/०० वा. ते ०३/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्री प्रकाश सुर्यभान सावरकर, रा. खापा ता. सावनेर याचे सोबत स्टाफ पाहणी करणे करीता गेले असता कोणीतरी अज्ञात इसमाने इलेक्ट्रीक ॲल्युमिनीयम तार सिमेंट पोल वरुन कापुन चोरी करुन नेल्याचे समजले वरुन तशी माहीती फिर्यादी यांनी वरिष्ठ अधिकारी यांना दिली. खापा महावितरण केंद्र अंतर्गत येणारे राजना हळद शिवारातील डीटीसी नं ४३६६२३४ ची लघुदाब वाहीणी इलेक्ट्रीक लाईन असुन श्री विलास देशमुख रा. केळवद, सुभाश खोरगडे रा. वाकोडी यांचे शेतातुन गेलेली असुन त्या सलग ०३ सिमेंट पोल वरील इलेक्ट्रीक ॲल्युमीनियम तार अंदाजे ५०० मीटर किंमती अंदाजे २५०००/– रुपयाचा मुद्देमाल दिनांक ३०/०७/२०२३ रोजीचे मध्यरात्री अंदाजे ०२/०० वा. ते ०३/०० वा. सुमारास कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रकाश नांदुरकर पोस्टे खापा मो. नं. ८६०५३८१५९० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. एम.आय.डी.सी बोरी** :— अंतर्गत सालईधाबा ता. हिंगणा येथे दिनांक ३१/०७/२०२३ ते दिनांक ०१/०८/२०२३ चे १७.०० वा. पर्यंत फिर्यादी नामे— ज्ञानेश्वर विठ्ठल कैकाडे रा. सालईधाबा यांची सालई धाबा परीसरातील एक किमी अंतरावर सात एकर शेती असुन पाच वर्षा आधी शेतातील विहीरीमध्ये दोन इलेक्ट्रीक मोटर ५ एच. पी. ची किंमती अंदाजे ८०००/— रूपये व दुसरी ५०००/— रूपयाची अशी लावलेली होती ती दि. ३१.७.२०२३ ला चार मजुरा सोबत काम करून संध्या. ०५.०० वाजता घरी परत आल्या नंतर आज सकाळी ७.०० वाजता मजुरा सोबत शेतावर गेले असता शेतातील विहीरीतील पाण्यातील पाणबुडी इलेक्ट्रीक मोटर दोन्ही अंदाजे किंमती १३,०००/— रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एम. आय. डी. सी. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस नायक शाहु मो. नं. ९३७३०९६१२७४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**